REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २ मार्च, १९३८ अंक ९

अप-टु-डेट शिलाई करतां
मांहिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक पुणें १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा
कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार
" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."
श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं. २.
महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत. तरी विशेष माहिती-करितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

—मनपसंत काम—
रिसबूड ब्रदर्स-टेलर्स
वक्तशीरपणाची गॅरंटी. सदाशिव हौदानजिक, पुणें.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशां-साठी भोजनाचें व उतर-ण्याचें निर्धास्त ठिकाण.
पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड-गणपती चौक-पुणें.
हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

# विविध माहिती

**दरवाज्याच्या पाटीला करह्यांचें कपाट**

रहात्या घरांतल्या किंवा कचेरींतील खोल्यांच्या दरवाजाच्या फळ्यांस आंतल्या बाजूनें चिकटून कपडे ठेवण्याचें कपाट बसवण्याची व्यवस्था मोठ्या खुबीनें केलेली एका ब्रिटिश प्रदर्शनांत दाखवण्यांत आली आहे. थोड्या जागेचा अधिकांत अधिक उपयोग व्हावा ह्या दृष्टीनें ही युक्ति केलेली असून अवजड सामान दरवाजामधून न्यावयाचें असतां जरूर पडल्यास हें कपाट तात्पुरतें काढून घेण्याची व्यवस्थाहि त्यांत आहे.

**घड्याळ काय उपयोगी ? कॅलेंडरकडे पहा.**

कित्येक सभांचा कार्यक्रम आटपशीर रीतीनें व थोड्या वेळांत उरकणें इष्ट व शक्य असतें तरीहि अशा प्रसंगीं लंबीचवडीं भाषणें ठोकून देण्याचा मोह कित्येक वक्त्यांस आवरत नाहीं. असल्याच एका सभेंत एका ब्रिटिश वक्त्यानें बराच वेळ कंटाळवाणें भाषण केल्यावर आपलें भाषण फार लांबल्याची त्यास जाणीव होऊन शेजारी बसलेल्या अध्यक्षांस घड्याळ आहे का ! म्हणून विचारलें. त्यानें उत्तर केलें:—" घड्याळ काय उपयोगी! समोर कॅलेंडर आहे, तिकडे पहा. "

**अहमदाबाद–प्रांतज रेल्वे**

वरील रेल्वे मंडळीची वार्षिक सभा मि. स्टिलमन ह्यांचे अध्यक्षतेखाली गेल्या आठवड्यांत भरली होती, त्यावेळीं मंडळीचा वार्षिक अहवाल व ताळेबंद ह्यांस मान्यता देण्यांत आली. १० टक्के डिव्हिडंड व २½ टक्के बोनस मंजूर झालें.

**मोटार मालकांची प्रचंड संस्था**

वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल असोसिएशन ह्या मोटार–मालकांच्या संस्थेची स्थापना १९ उत्साही मोटार मालकांच्या प्रेरणेनें २० वर्षांपूर्वी झाली. आतां ह्या संस्थेचे ७,१०० सभासद आहेत. जगाच्या पूर्वार्धांत हिच्याइतकी मोठी असली दुसरी संस्था नाहीं. तिच्या दोन ठिकाणीं शाखा आहेत, सभासदांसाठी मोफत बचावाची योजना आहे व रस्त्यांवर मोटार नादुरुस्त झाल्यास दुरुस्तीची तजवीज आहे. अशाच प्रकारची दुसरी एक संस्था स्थापन करण्याचे मुंबईत प्रयत्न चालू आहेत.

**सूत कातण्यांत पहिला नंबर**

हरिपुरा येथील सूत कातण्याच्या चढाओढींत सावळी येथील गिरिजाबाई ह्या महाराष्ट्रीय शेतकरी बाईस पहिलें बक्षीस ( एक सोनेरी चरखा व २५ रु. ) मिळालें. चार तासांत तिनें २५ नंबरी २,६४० वार सूत काढलें. तिचा पति, जयराम, ह्यास दुसऱ्या अनुक्रमाचें बक्षीस मिळालें.

**विठ्ठलनगरांतून गेलेल्या तारा**

विठ्ठलनगर ( हरिपुरा ) येथील काँग्रेसच्या अधिवेशनाचे अवधींत तेथील तात्पुरत्या तार ऑफिसचे मार्फत वेगवेगळ्या वर्तमानपत्रांना बातमीच्या तारा पाठविण्यांत आल्या, त्यांतील शब्दांची संख्या ३५ लक्ष इतकी भरली. खासगी तारा एकूण दोन हजार पाठविल्या गेल्या. तेथील टेलिफोनमधून इतर शहरांशीं १,२०० वेळां टेलिफोन करण्यांत आला. विठ्ठलनगरास टेलिफोनची सोय करून देण्यासाठीं २६० मैल लांबीची तांब्याची तार लागली.

**पोस्टमनास वर्षांतून दोनदां गणवेष**

ग्रेटब्रिटनमधील पोस्टमनांस पोस्टखात्याकडून वर्षांतून दोनदां गणवेष मिळतो; थंडीचे प्रारंभीं व उन्हाळ्याचे सुरवातीस. जुने कपडे स्वतःकरितां ठेवून घेण्याचा त्यांस अधिकार आहे.

**आगगाडीचे पोलादी डबे**

आगगाडीचे डबे लांकडाऐवजी पोलादाचे बनविल्यास अपघातापासून होणाऱ्या नुकसानीची तीव्रता कमी होते. आतां जर्मनमधील बहुतेक सर्व डबे पोलादी आहेत. अमेरिका, इटली, फ्रान्स ह्या देशांतहि पोलादी डब्यांचेंच प्राधान्य आहे. ग्रेटब्रिटनमधील शेकडा फक्त १५ डबेच पोलादाचे आहेत.

**ॲबिसिनियावरील इटलीचा ताबा**

ॲबिसिनियाच्या सर्व प्रदेशावर इटलीचा ताबा प्रभावी झाला असल्याचें सर जॉन सायमन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

**ट्रेझरी बिलांवर १ रु. ६ आ. ९ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा दर सरासरीनें द. सा. द. शे. १ रु. ६ आ. ९ पै इतका पडला.

**बँक ऑफ बरोडा लि.**

बँक ऑफ बरोडा लि.ला १९३७ साल अखेरच्या वर्षी ६ लक्ष, ५३ हजार रु. नफा झाला. बँकेची वार्षिक सभा बडोदा येथें ता. १५ फेब्रुवारी रोजीं भरली होती. त्यावेळीं २८ भागीदार हजर होते.

**विजेच्या दराबाबत चौकशी**

मुंबई प्रांतांतील सात वर्षांपेक्षा ज्यास्त जुन्या वीज कंपन्यांच्या दराबाबाबत चौकशी करून, सदरहु कंपन्यांस कोणता कमाल दर आकारूं द्यावा, ह्याविषयीं सूचना करण्यासाठीं मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. दि. ब. कृष्णलाल जव्हेरी हे तिचे अध्यक्ष असुन डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज श्री. अडवाणी, स्पेशल ऑडिटर श्री. दासगुप्त व सरकारी इलेक्ट्रिकल इंजीनियर मि. हिघॅम हे सभासद आहेत.

**चित्रपटांची लोकप्रियता**

ग्रेटब्रिटनमधील १५ वर्षांवरील वयाचा प्रत्येक मनुष्य १९३४ सालीं सरासरीनें तीन वेळां सिनेमा पहावयास गेला असावा असा अंदाज करण्यांत आला आहे. हा आकडा गेल्या तीन वर्षांत वाढला आहे. वरील वयोमर्यादेंतील माणसांमध्यें दर नऊ जणांत एक ह्या प्रमाणांत सिनेमागृहांत बसण्याची जागा आहे. म्हणजे, त्यांपैकी एक नवमांश माणसें एकाच वेळीं सिनेमा पहावयास गेलीं तर त्यांस पुरेशा जागेची ( सीट्सची ) सोय आहे.

**मुंबई सरकारचें बजेट**

| | १९३७-३८ ( कोटि रु. ) | १९३८-३९ ( कोटि रु. ) |
|---|---|---|
| उत्पन्न | १२-३० | १२·०९ |
| खर्च | १२-१२¾ | १२-५० |
| वाढावा + अगर तूट – | +१०¾ | –४१ |

सरकारनें येत्या वर्षी कांहीं नवीन बाबींवर खर्च करण्याचें ठरविलें आहे. हा खर्च एकदांच व्हावयाचा असल्यानें, नव्या वर्षाच्या प्रारंभीच्या ५१ लाखांच्या शिलकेंतून तो भागविण्यांत येईल. म्हणजे वर दिसणारी तूट रहाणार नाहीं; शिल्लक मात्र कमी होईल.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रु. किंमत |
|---|---|
| १३-२-३८ ते १९-२-३८ | ९२,९१,३५८ |
| २०-२-३८ ते २६-२-३८ | ६१,९६,७६६ |
| २१-९-३१ ते २६-२-३८ | ३,११,७०,६९,६२९ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ९८ | मोटार गाड्यांचें उत्पादन—मीठ तयार करण्यास मुभा | |
| २ मुंबई सरकारचें अंदाजपत्रक ... | ९९ | ६ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. | १०३ |
| ३ ग्वालेर संस्थानांत ग्राम-सुधारणा ... ... | १०० | ७ वेस्टर्न इंडिया हाउस | १०३ |
| ४ मॉ. को. इन्स्टिट्यूट | १०० | ८ सहकारी चळवळीचें पुनरुज्जीवन ... | १०४ |
| ५ स्फुट विचार ... | १०१ | ९ हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक ... | १०४ |
| हिंदी रेल्वेजचा कारभार: येरे माझ्या मागल्या—स्वदेशी रेल्वे इंजिनें-स्वदेशी मालाची खरेदी करा—गोमांतकाची आर्थिक परिस्थिति—ब्रिटिश | | १० वीज कंपन्यांच्या नफ्यावर नियंत्रण ... | १०५ |
| | | ११ कोर्ट फी, स्टँप ड्यूटी व वीज पट्टी कायम होणार | १०६ |
| | | १२ निवडक बाजारभाव | १०७ |



# अर्थ

बुधवार, ता. २ मार्च, १९३८


## मुंबई सरकारचें अंदाजपत्रक

मुंबई प्रांतिक सरकारचे फडनवीस, श्री. लठ्ठे, ह्यांनीं १९३८–३९ सालाविषयींचें बजेट कायदेमंडळास गेल्या शुक्रवारीं सादर केलें. प्रथम त्यांनीं चालू वर्षाच्या उत्पन्न-खर्चासंबंधीं माहिती सांगितली, तीवरून अपेक्षेपेक्षां परिस्थिति समाधानकारक असल्याचें आढळून येते. गेल्या ऑगस्टमध्यें, कायदेमंडळानें मंजूर केलेल्या बजेटांत १८½ लक्ष रुपयांची तूट येईल, असा अदमास होता. तथापि, एक्साइज व स्टँप ड्यूटी ह्यांच्या उत्पन्नांत २१½ लाखांची वाढ झाली व नीमायर योजनेस अनुसरून ह्या प्रांतास मिळावयाच्या २७ लाखांची भरहि उत्पन्नांत पडली आहे. १९३७–३८ मध्यें व्हावयाच्या खर्चांत ४६ लक्ष, ९१ हजारांची वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. परंतु सर्व खात्यांत करण्यांत आलेल्या काटकसरीमुळें मूळ अंदाजी खर्च २लक्ष १२ हजारांपेक्षा जास्त रकमेनें वाढणार नाहीं. ह्या सर्व बाबींचा परिणाम १८½ लाखांच्या अपेक्षित तुटीचें १०½ लक्षांच्या वाढाव्यांत रूपांतर होण्यांत दिसून येईल अशी अपेक्षा आहे.

येत्या वर्षी प्रांतिक सरकारचें उत्पन्न १२ कोटि, ९ लक्ष रु. इतकें भरेल व नवीन खर्चाच्या बाबी हिशेबांत धरून एकूण खर्चाचा आकडा १२ कोटि, ५० लक्ष इतका होईल, म्हणजे, उत्पन्नापेक्षा खर्च ४१ लाखांनीं ज्यास्त होईल असें फडनवीसांस वाटत आहे. नवीन खर्चाच्या बाबी पुनः न उद्भवणाऱ्या, मोठ्या स्वरूपाच्या असल्यानें त्या १९३६-३७ व १९३७-३८ ह्या वर्षांतील शिलकांतून भागवाव्या, अशी त्यांची सूचना आहे. असें केलें म्हणजे ३३ लाखांची बाकी उरते, परंतु तींपैकीं २२ लक्ष, ८१ हजार रुपये चालू खर्चास घेतां येण्याजोगे नाहींत. ह्या हिशेबानें, वर्षअखेर १० लक्ष रुपयांची शिल्लक रहाते. येत्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत दिसणारी तूट ही खरी तूट नसल्यानें, गेल्या वर्षांतील शिल्लक खर्च करून ती भरून काढणें अगदीं रास्त आहे असें फडनवीसांचें म्हणणें आहे.

दिवाणगिरी स्वीकारल्या दिवसापासून काँग्रेस प्रधानमंडळानें काटकसरीची शिकस्त केली असून खर्चास आणखी काट मारण्यास आतां वाव राहिलेला सरकारास दिसत नाहीं. मोठ्या पगारांस कात्री लावतां येत नाहीं व कमी पगारांत कपात करणें युक्त नाहीं. भारतमंत्र्यांच्या अधिकारांतील जागांस प्रधानमंडळास हातहि लावतां येत नाहीं. टॉमस कमिटीच्या शिफारसींची छाननी करून काटकसरीचें धोरण नेटानें चालविण्याचा सरकारचा विचार असून स्थानिक स्वराज्य संस्थांस द्यावयाच्या ग्रँटमध्यें येत्या वर्षी १० लाखांची बचत करण्याचा त्यांचा बेत आहे. कित्येक स्थानिक स्वराज्यसंस्था उत्पन्नाच्या बाबींकडे दुर्लक्ष्य करीत आहेत, त्यांचेवर उत्पन्न वाढविण्याची जबाबदारी टाकण्याचें सरकारचें धोरण आहे. ह्या विषयाची पूर्ण चौकशी करून सूचना करण्यासाठीं एक कमिटी लवकरच नेमण्यांत येईल.

मुंबई सरकारावरील कर्जाचा बोजा अत्यंत अवजड असून, त्याप्रीत्यर्थ ह्या प्रांतास दरसाल ९० लक्ष, ६३ हजारांचा खर्च येतो. एकूण उत्पन्नाच्या ७½ टक्के रकम कर्जावरील व्याजापायींच खर्च होते. एकंदर कर्जाची रकम २३ कोटि रुपयांवर आहे. ज्या बाबींसाठीं कर्ज उभारण्यांत आलें, त्यांपासून येत्या वर्षी २२लक्ष, ३७ हजार रुपये उत्पन्न होईल व १ कोटि, १३ लक्ष रुपयांच्या, देण्याची सरकारास व्यवस्था करावी लागेल. सरकारचें बहुतेक सर्व कर्ज अनुत्पादक स्वरूपाचेंच आहे. मुंबई येथील बँकबेवरील जमिनींच्या उठावाचा व वरळी येथील चाळीसंबंधानें कामगार वर्गाचा प्रतिकूल झालेला ग्रह दूर करण्याचा यत्न सरकार करणार आहे, त्यामुळें ह्या अनुत्पादक योजनांपासुन कांहीं तरी उत्पन्न मिळू शकेल, अशी आशा आहे.

फिनॅन्स बिलांत प्रधान मंडळानें सुचविलेली दुरुस्ती कायदेमंडळानें मान्य केली, म्हणजे नव्या इलेक्ट्रिसिटीड्यूटीपासून ५ लक्ष रुपये सरकारास ज्यास्त मिळतील व स्टँप ड्यूटीच्या मिळकतींत ३ लाखांची भर पडेल. वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबावरील पट्टीची योजना अद्याप पुरी झालेली नाहीं; तथापि, ह्या बाबीपासून ३ लक्ष रुपये अपेक्षित आहेत. तंबाखूवरील कराचें उत्पन्न १ लाखानें वाढेल. ह्या १२½ लक्ष रुपयांचा विनियोग खालीलप्रमाणें करण्यांत यावयाचा आहेः—शिक्षणः—८ लक्ष ९२ हजार; दारूबंदीः—१ लक्ष ६० हजार; शेती व सहकारः—१ लक्ष ८० हजार; उद्योगधंदेः—२० हजार; आयुर्वेदिक व युनानी शिक्षणः—२० हजार. एकूणः—१२ लक्ष ९२ हजार रु. उपरिनिर्दिष्ट उत्पन्न-खर्चांचा अंदाजपत्रकांत समावेश नाहीं, परंतु वर्षअखेर हिशेबाच्या दोन्हीं बाजूंत २२ लाखांची भर पडेल व नियोजित ज्यादा खर्चाची तरतूद केली जाईल.

श्री. लठ्ठे ह्यांनीं आपल्या भाषणाचे अखेर बजेटाचें समालोचन केलें व काँग्रेस प्रधानमंडळाचा कार्यक्रम त्याच्या जाहीर धोरणास अनुसरून कसा आहे, हें त्यांनीं दाखवून दिलें. दारूबंदीप्रीत्यर्थ सरकार ३१ लक्ष, ५० हजारांची तरतूद करीत आहे. शिक्षणावर ३३ लक्ष ९२ हजार रु. येत्या वर्षी ज्यास्त खर्च होणार आहेत. शहरांपेक्षा खेडेगांवांकडे जास्त लक्ष पुरविण्याची आवश्यकता असल्यानें खेडेगांवांतील पंचायती, पाणीपुरवठा, वैद्यकीय मदत, रस्ते, इत्यादींसाठीं बजेटांत ३९ लाखांची तरतूद आहे. गिरणी कामगारांच्या उन्नतीसाठीं १ लाख रु. बाजूस काढून ठेवले आहेत. अर्थात्, उत्पन्नाच्या बाबतींत मोठी वाढ होण्याजोगी नसल्यानें सरकारास अंथरूण पाहूनच पाय पसरणें आवश्यक आहे. तथापि, आपल्या हातीं असलेल्या सर्व साधनांची छाननी करून प्रधानमंडळानें उत्पन्नाचा विनियोग उपयुक्त मार्गानें करण्याचें योजिलें आहे, ह्यांत शंका नाहीं. प्रग-

तीचें पाऊल ह्यापेक्षां जलद पडणें इष्ट असलें, तरी सध्याच्या परिस्थितींत तें अशक्यप्राय आहे ही गोष्ट ध्यानांत बाळगल्यास, प्रस्तुत अंदाजपत्रकाबद्दल फडनवीस अभिनंदनास पात्र आहेत, ह्याविषयीं दुमत होणार नाहीं. मुंबई सरकारनें आपलें धोरण आखून तें पार पाडण्यास निश्चित रीतीनें पद्धतशीर प्रारंभ केला आहे. त्यांच्या ह्या प्रयत्नास सार्वत्रिक पाठिंबा मिळेल, ह्याविषयीं शंका नाहीं.

## ग्वालेर संस्थानांत ग्राम-सुधारणा

### कमिटीच्या सूचना

### (१)

आपल्या राज्यांत ग्रामसुधारणेचें कार्य पद्धतशीर व्हावें ह्या हेतूनें ग्वालेरच्या महाराजांनीं एक कोटि रुपयांचा निधि बाजूस काढून ठेवण्याचें ठरवून त्या कामीं आपणांस सल्ला देण्याकरितां स्थानिक मंत्री व बाहेरील तज्ज्ञ ह्यांची एक कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट नुकताच छापून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ग्वालेर संस्थानांतील ग्रामीण जीवनाची सद्यःस्थिति, ती सुधारण्याबाबतचें महाराजांचें ध्येय व त्या कार्यास सहायकारक होण्यासारखीं साधनें, आवश्यक असलेल्या उपायांचें स्वरूप व ते अंमलांत आणण्याचे मार्ग, ग्रामसुधारणा-कार्याची संघटना व तें हातीं घेण्याची अनेकविध योजना इत्यादि प्रकरणें कमिटीच्या रिपोर्टांत आहेत. शेतीचें सरकारी खातें, पाटबंधारे, जनावरांची निगा, सहकार, स्त्रियांची उन्नति, शिक्षण व एंजिनिअरिंग ह्या विषयांवर परिशिष्टें रिपोर्टास जोडलीं आहेत.

ग्रामसुधारणेच्या कार्याचें उद्दिष्ट व त्याचें स्वरूप काय आहे, खेडेगांवीं लोकांची स्थिति आजमितीस कशी अत्यंत हलाखीची आहे, महाराजांचें उच्च ध्येय व औदार्य आणि त्याचप्रमाणें, ग्वालेर संस्थानांत आजपर्यंत झालेलीं लोकहिताचीं कामें हीं सर्व किती आशादायक आहेत हें सांगून कमिटीनें सुधारणेच्या योजनेची रूपरेखा स्थूल मानानें आखली आहे. ह्या योजनेंत आर्थिक उपायांस महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे तें सर्वस्वी उचित आहे. "आशा व प्रगतीविषयींची आकांक्षा ह्या ग्रामसुधारणेच्या प्रेरक शक्ति आहेत, परंतु त्या शक्तींचा उपयोग करतां येईल अशा प्रकारची अनुकूल परिस्थिति आवश्यक आहे. शेतकऱ्याचें पोट भरत नसतां त्याची उन्नति करण्याचा खटाटोप व्यर्थ आहे. शेतकरी वर्गाचें आरोग्य, सुख व आर्थिक स्थितींत सुधारणा ह्या गोष्टी साध्य होण्यास त्याची कमाई व आर्थिक शक्ती वाढली पाहिजे" हे कमिटीचे उद्गार महत्त्वाचे असून ग्रामसुधारणेविषयीं तिची भूमिका काय आहे ह्याची उत्तम कल्पना त्यांवरून येते.

शेतकऱ्यांस आपल्या धंद्यासंबंधानें शाश्वती वाटावी ह्याकरितां जमीन धारणाच्या पद्धतींत आवश्यक सुधारणा, कर्जबाजारीपणाच्या निवारणासाठीं तडजोडीची व्यवस्था, शेतीमालाच्या पद्धतशीर विक्रीची तजवीज, प्रो. काळे त्यांच्या शिफारसींस अनुसरून सहकारी चळवळीची घटना, संस्थानांमधून निर्गत होणाऱ्या मालावर घेतल्या जाणाऱ्या जकातींचा शेतीच्या दृष्टीनें विचार, शेतीच्या व्यवसायांत व जनावरांच्या स्थितींत सुधारणार, खेडेगांवीं उद्योगधंद्यांची वाढ व जोपासना, रा. ब. पाटील ह्यांनीं केलेल्या शेतीच्या स्थितिविषयींच्या चौकशीच्या धर्तीवर आर्थिक व सामाजिक स्थितीसंबंधानें माहिती गोळा करण्याचें महत्त्व, खेडेगांवीं रस्त्यांचा विस्तार इत्यादि बाबी कमिटीनें ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमाचीं महत्त्वाचीं अंगें म्हणून सुचवल्या आहेत.

## प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट

### पुनर्घटना कशी करावी ?

### (१)

प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटची घटना आणि कार्यक्षेत्र यांचे संबंधानें सरकारनें योजना सुचविली आहे तिच्या विरुद्ध सहकारी लोकमत व्यक्त केलें जात आहे हें अगदी स्वाभाविक आहे. तथापि, अलीकडे उत्पन्न झालेली सहकारी चळवळीची परिस्थिति लक्षांत घेतां सरकारनें सुचवलेल्या योजनेशीं विसंगत होणार नाहीं आणि त्याचप्रमाणें, इन्स्टिट्यूटचा मूळ उद्देश व कार्यव्याप्ती यांच्याशीं मिळती होईल अशी त्या संस्थेची पुनर्घटना करणें अगत्याचें असून तें अवघड असलें तरी अशक्य नाहीं असें "अर्थ"च्या गेल्या अंकांत आम्हीं ध्वनित केलें होतें. आपल्या व्यापक ध्येयाची व कार्यकक्षेची भूमिका इन्स्टिट्यूटनें न सोडतां सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं सरकारी योजना त्यास कशी ग्राह्य करून घेतां येईल हा येथें व्यवहारचातुर्याचा प्रश्न आहे. आपल्या सध्याच्या घटनेंत दोष असून ते दूर करणें आवश्यक आहे ह्याची जाणीव सर्व सहकाऱ्यांस आहे आणि ह्याच दृष्टीनें खुद्द इन्स्टिट्यूटनेंच मागें कित्येक दुरुस्त्या सुचवल्या होत्या. त्या नंतर जिल्हा सुपर्व्हायझिंग यूनिअन्सच्या बोर्डासारख्या नव्या संस्था अस्तित्वांत येऊन इन्स्टिट्यूटच्या शाखांचें महत्त्व किंबहुना नाहीसें झाल्यासारखें झालें आहे. अशा परिस्थितींत, तत्त्व न सोडतां तडजोडीनें कार्यभाग साधण्यांतच शहाणपणा आहे.

सरकारी योजनेंत इन्स्टिट्यूटनें करावयाच्या शिक्षणकार्यावरच सर्वत्र भर दिला असून तिला अनुसरून सदरहु संस्था केवळ शिक्षणाचें इन्स्टिट्यूटच बनणार आहे. परंतु इन्स्टिट्यूटचे मूळचे व्यापक उद्देश व ध्येय हीं काढून टाका असें सरकारनें कोठेंहि म्हटलेलें नसून तीं अबाधित राहाण्यासंबंधानें सहकारी कार्यकर्त्यांनीं आग्रह धरण्यास सरकारची आडकाठी येण्याचें कारण नाहीं. सरकारच्या २७ जानेवारीच्या ठरावांत शिक्षणाशिवाय इन्स्टिट्यूटनें "सहकारी चळवळीबाबतच्या निरनिराळ्या प्रश्नांविषयींचें बिनसरकारी लोकमत एकत्रित करून तें योग्य अधिकाऱ्यांस कळवणें आणि प्रतिवर्षी एकदा चळवळीचा आढावा घेऊन प्रगतीसंबंधानें सरकारास जरूर त्या सूचना करणें" हीं कामें करावीं असें म्हटलें आहे. शिक्षणाच्या कार्यासाठीं सरकारनें एक कमिटी व सर्वसाधारण सभा ह्यांची घटना सुचविली आहे; परंतु वरील इतर कामाकरितां तशीच योजना सुचविण्याचें सरकारचें राहून गेलें आहे. हें वैगुण्य सहकारी कार्यकर्त्यांस दूर करतां येईल आणि इन्स्टिट्यूटची कार्यकारी कमिटी आणि कौन्सिल ह्यांनीं ही जोड पुनर्घटना सरकारास सुचविली पाहिजे. चळवळीचा आढावा घेणें, लोकमत अजमावून अधिकाऱ्यांस कळवणें, प्रगतीविषयीं विधायक सूचना करणें, हीं कामें केवळ शिक्षणकार्यास वाहिलेल्या कमिटीच्या हातून होणें शक्य नाहीं. त्या कामाकरितां निराळी कमिटी व तिच्यावर देखरेख करणारी सभा अस्तित्वांत असणें ओघानेंच प्राप्त होतें. आज सेंट्रल एज्युकेशन बोर्ड आणि एक्झिक्युटिव्ह कमिटी अशा दोन उपसमित्या प्रॉव्हिन्शिअल इन्स्टिट्यूटमध्यें आहेतच. त्याचप्रमाणें, सरकारी योजनेंतल्या एकमेव शिक्षण कमिटीच्या बरोबरीनें तिच्या कक्षेबाहेरील इतर सर्व कामें करण्यासाठीं सर्वसाधारण कमिटीचा स्वतंत्र घटक निर्माण करितां येईल. ही घटना सरकारी योजनेस विरोधक नसून पूरक आहे आणि सरकारचें जाहीर झालेलें उद्दिष्ट सफळ करण्यास अगत्याची अशी आहे. ह्या दोन कमिट्यांस प्रत्येकी एक अध्यक्ष व चिटनवीस राहील आणि इन्स्टिट्यूटचा म्हणून एक अध्यक्ष त्यांचेपैकी किंवा निराळा असूं शकेल.

## स्फुट विचार

### हिंदी रेल्वेजचा कारभार–येरे माझ्या मागल्या

मध्यवर्ती कायदेमंडळांत आज कित्येक वर्षें हिंदी रेल्वेजच्या कारभाराविषयीं तक्रारी होत असून सरकारनें मागितलेल्या खर्चाच्या रकमा बहुमतानें नाकारल्या किंवा कमी केल्या जात आहेत. तथापि, त्या बाबतींतल्या सरकारी धोरणांत विशेष महत्त्वाचा फरक झालेला दिसून येत नाहीं. रेल्वेजमधल्या उच्च दर्जाच्या व मोठ्या पगारांच्या जागांवर हिंदी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या जाव्या या लोकांच्या सूचनेची अंमलबजावणी त्वरित होत नाहीं, हें गाऱ्हाणें अजून शिल्लक असून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें यंदाहि तें पुढें मांडण्यांत येऊन त्या संबंधांतल्या सरकारच्या खुलाशानें सभासदांचें समाधान न झाल्याकारणानें सुचविलेली मागणींतली कपात बहुमतानें मंजूर झाली. सर टॉमस स्टुअर्ट ह्यांनीं सरकारच्या वतीनें भाषण करतांना हिंदी अधिकाऱ्यांच्या नेमणुकांविषयींचे वाढते आकडे पुढें मांडले. तथापि, खुद्द रेल्वे बोर्डावर अजून एकहि हिंदी सभासद नाहीं आणि कोणत्याहि मोठ्या रेल्वेच्या एजंटाचे जागेवर हिंदी अधिकारी नाहीं, ह्या टीकेस त्यांस कांहींच उत्तर देतां आलें नाहीं. ह्यापुढें हिंदी रेल्वेजमध्यें युरोपिअनांच्या नेमणूका न होतां प्रत्येक महत्त्वाच्या जागेवर हिंदी अधिकारीच नेमला गेला पाहिजे असा लोकप्रतिनिधींचा असेंब्लीमध्यें आग्रह होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. लायक हिंदी माणसें उच्च दर्जाच्या जागांकरितां मिळत नाहींत ह्या मुद्यास आतां कोणीहि महत्त्व देणें शक्य नाहीं.

---

### स्वदेशी रेल्वे एंजिनें

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें रेल्वेजच्या कारभारासंबंधानें झालेल्या चर्चेंत, रेल्वे एंजिनें तयार करण्याचा कारखाना ह्या देशांत सरकारनें चालवावा अशी मागणी लोकनियुक्त सभासदांनीं केली. ह्या विषयावरहि वर्षानुवर्ष वादविवाद होत आला असून सरकारनें तिला सारखा नकार दिलेला आहे. हिंदी रेल्वेजच्या उपयोगासाठी लागणाऱ्या एंजिनांची संख्या अत्यंत अल्प असल्यानें त्यांच्या बनावटीचा प्रयत्न ह्या देशांत करणें नुकसानकारक व अव्यवहारिक आहे असें रेल्वे बोर्डाचें म्हणणें आहे. ह्याहि बाबतींतले आकडे सर टॉमस स्टुअर्ट ह्यांनीं पुढें मांडले आणि ५०–६० लहान-मोठ्या दरवर्षीं विकत घ्याव्या लागणाऱ्या इंजिनांच्या पुरवठ्यासाठीं ह्या देशांत कारखाना काढूं पहाणें वेडेपणाचें आहे, असें सांगितलें. असा कारखाना स्वतःच्या पायावर उभा राहूं शकत नसल्यानें सरकारी मदतीची त्यास जरूर पडणार आणि ह्या रीतीनें आंतबट्ट्याचा धंदा करणें श्रेयस्कर नाहीं, एवढेंच नव्हे तर सरकार व कायदेमंडळ ह्या दोघांसहि मान्य झालेल्या औद्योगिक संरक्षणाच्या धोरणास हरताळ फासणें होय असा शेरा त्यांनीं मारला. रेल्वेजना लागणारे रूळ व वाघिणी देशांतल्या देशांत तयार होण्याचें महत्त्व सर्व राष्ट्रांत व हिंदुस्थानांतहि मान्य झालेलें असून गेल्या महायुद्धांतल्या अनुभवानें तें स्पष्ट सिद्ध केलेलें आहे, याचा विसर सर टॉमस स्टुअर्ट ह्यांस पडलेला दिसतो. रेल्वेजना लागणारी सामुग्री राष्ट्राच्या संरक्षणाच्या तयारीचा एक महत्वाचा भाग आहे, ह्या तत्वाचें विस्मरण होऊन चालणार नाहीं. ह्यासंबंधांत येणारा तोटा हा आवश्यक राष्ट्रीय खर्चाचाच एक भाग असतो ही गोष्ट हिंदुस्थान सरकारनें लक्षांत बाळगली पाहिजे. ह्या प्रश्नाविषयींचें हिंदी लोकमत इतकें ठाम आहे कीं, मध्यवर्ती असेंब्लींत त्यावरील चर्चेंत सरकारचा पराभव झाला हें सांगावयास नको.

---

### रेल्वेजकरितां स्वदेशी मालाची खरेदी करा

रेल्वेजच्या संबंधांत तिसऱ्या एका प्रश्नावर लोकमत प्रभावी ठरलें, ती बाब रेल्वे स्टोअर्सच्या खरेदीविषयींची होय. हिंदी रेल्वेजना लागणारा माल हिंदुस्थानांतच विकत घेतला जाऊन शक्यतोंवर तो स्वदेशी असावा ह्या लोकमताच्या मागणीस योग्य मान दिला जात नाहीं अशी तक्रार करण्यांत आली. कंपन्यांच्या व्यवस्थेखाली असलेल्या रेल्वेजमध्यें स्वदेशी माल व स्वदेशी व्यापार ह्यांसंबंधानें विशेष बेफिकीरपणा दिसून येतो. सरकारच्या बाजूनें बोलतांना सर टॉमस स्टुअर्ट ह्यांनीं असें सांगितलें कीं, रेल्वेजना जरूर असलेला माल ह्या देशांतच खरेदी केला जावा असें रेल्वे बोर्डाचें धोरण आहे आणि कंपन्यांच्या व्यवस्थेखालच्या रेल्वेजवरहि त्याची अंमलबजावणी अधिकाधिक होत आहे. स्टोअर्स खात्याशीं विचारविनिमय होऊनच रेल्वे बोर्ड त्या बाबतींत व्यवस्था करीत असतें असें त्यांनीं सांगितलें. हिंदी रेल्वेजचा उद्योग प्रचंड प्रमाणावर चाललेला आहे. अधिकाऱ्यांच्या नेमणुकाबाबत त्याचें संपूर्ण हिंदीकरण व्हावयास पाहिजे, त्याप्रमाणेंच त्यांनीं वापरावयाच्या मालाचें स्वदेशीकरण होणें अगत्याचें आहे. तें होईल तर स्वदेशी उद्योगधंदे व व्यापार ह्यांस उत्तेजन मिळून हिंदी राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीस सहाय होईल. प्रत्येक स्वतंत्र देशांत स्वदेशी मालाच्या खरेदीवर सरकार व जनता ह्यांचा कटाक्ष असतो. हिंदुस्थानांत ह्यासंबंधांत लोकांस सरकारी धोरणाविरुद्ध तक्रार करण्यास जागा कां रहावी ?

---

### गोमांतकाची आर्थिक परिस्थिति

ह्या विषयावर मडगांव–गोवा येथील श्री. काशिनाथ दामोदर नायक यांनीं उपयुक्त माहितीनें भरलेला एक निबंध लिहून प्रसिद्ध केला आहे. गेल्या पाव शतकांत गोंव्याची आर्थिक परिस्थिति खालावली कीं सुधारली ह्याचा विचार त्यांत केलेला असून व्यापार, शेती व उद्योगधंदे ह्यांच्यासंबंधानें आकडेवार माहिती देऊन तिच्या आधारावर निबंध-लेखकांनीं आपलीं अनमानें रचलीं आहेत. प्रथमत: गोमांतकाचें ऐतिहासिक महत्त्व काय आहे आणि त्याचें भौगोलिक स्थान कोणत्या प्रकारचें आहे ह्याची माहिती देण्यांत आली आहे. तीमध्यें नाण्यांची दिलेली माहिती मनोरंजक आहे. गोंव्याच्या आयात–निर्गत व्यापाराचे तुलनात्मक आकडे देऊन श्री. नाईक ह्यांनीं, निर्गतीपेक्षा आयातीची रकम वाढण्याची प्रवृत्ति अलीकडे विशेष बळावल्याचें निदर्शनास आणून परकीय येण्या–देण्यामधली लिंट कशी भरून काढावी हा प्रश्न उपस्थित केला आहे. वरील तफावतीचें एक कारण, आयात मालापेक्षां निर्गत मालाच्या बाजारभावांत अधिक झालेली घट हें असून मालाचें परिमाण आणि किंमती ह्यांची मागच्या आणि आतांच्या काळांत तुलना केली असतां तें स्पष्ट होईल. त्यापेक्षाहि बळवत्तर कारण म्हणजे ‘ अदृश्य ’ निर्गत हें होय. व्यापाराच्या आकड्यांमध्यें ती नमूद नसते, पण आंतरराष्ट्रीय देवघेवीच्या आढाव्यांत ती हिशेबांत घ्यावी लागते. ह्या अदृश्य निर्गतीबद्दलचें येणें गोमांतकास कसें मिळतें ह्याची माहिती श्री. नाईक यांनीं पृष्ठ २१ वर दिली आहे. आयात-निर्गतीमधील तफावतीस भिण्याचें कारण नाहीं हें तीवरून उघड

होईल. ग्रेटब्रिटनची परिस्थिति विशिष्ट कारणांमुळें त्या प्रकारचीच आहे. स्कॉटलंडची आणि रत्नागिरीच्या कोकणपट्टीचीहि स्थिति ह्याच रीतीची आहे. सुधारणेच्या इतर उपायांबरोबर परदेशगमनावर निबंध-लेखकांनीं विशेष जोर दिला आहे, तो ह्या दृष्टीनें उचित आहे. गोमांतकासारख्या चिमुकल्या राष्ट्रास सध्याच्या जागतिक आर्थिक अवस्थेंत कोणत्या गोष्टी शक्य आहेत व कोणत्या नाहींत ह्याचें त्यांनीं केलेलें परीक्षण मार्मिक आहे. मालाच्या उत्पादनांत आणि शेती व इतर धंदे ह्यांच्या संघटनेंत प्रगति होण्याची शक्याशक्यता त्यांनीं दाखविली आहे. त्यांचा निबंध एकंदरीनें आशावादी आहे आणि हीच भूमिका,त्यांनीं दिलेली माहिती व केलेल्या विधायक सूचना ह्यांचा विचार करतां, योग्य आहे.

### मोटार गाड्यांचें उत्पादन—ब्रिटिश धंद्याचें भवितव्य

ग्रेटब्रिटनमध्यें, गेल्या वर्षीं एकूण १७ लक्ष, ९८ हजार खासगी मोटार गाड्या नोंदण्यांत आल्या. १९३६ च्या मानानें नोंदणीचा हा आकडा १ लक्ष, ५५ हजारांनीं मोठा आहे. प्रत्येक मोटारीची अश्वशक्ति सरासरीनें १२ इतकी होती. कमी अश्वशक्तीच्या गाड्यांची लोकप्रियता वाढत आहे. रस्त्यांवरील वहानांच्या व वहातुकीच्या गर्दीमुळें मोठ्या गाड्यांस आपलें वैशिष्टय दाखविण्यास संधीच मिळत नाहीं व त्या कारणानें लहान गाड्यांचा खप मोठ्या प्रमाणावर होतो. परदेशी गाड्यांची आयात वाढत आहे; मात्र ह्या व्यापारांतील उत्तर अमेरिकेचा हिस्सा कमी होत आहे. युरोपांतील देशांत बनविलेल्या गाड्यांची ब्रिटिश गाड्यांशीं खुद्द ग्रेटब्रिटनमध्यें स्पर्धा चालते. साम्राज्याच्या बाहेरील देशांतून येणाऱ्या गाडयांवर ३३⅓ टक्के जकात आहे, ती भरूनहि ब्रिटिश गाड्यांशीं त्या टक्कर देऊं शकतात, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. ब्रिटिश गाडयांच्या निर्गतीपैकीं शेकडा ८१ गाडया साम्राज्यांतच खपतात व एकूण उत्पादनाच्या शेकडा ७५ गाड्या ग्रेटब्रिटनमध्यें विकल्या जातात. मोटारगाडयांच्या निर्गतीच्या व्यापाराचें भवितव्य निराशाजनक नाहीं, असें 'स्टेटिस्ट' पत्र म्हणतें.

### मीठ तयार करण्यास मुभा

१९३१ सालाच्या दिल्ली करारानें, ज्या ठिकाणीं मीठ तयार करतां येणें शक्य आहे अशा गांवांतील लोकांस खासगी उपयोगास लागणारें मीठ करण्याची किंवा गोळा करण्याची मुभा दिली होती. गांवास लागणाऱ्या मिठापेक्षा ज्यास्त मीठ मात्र अशा रीतीनें तयार अथवा गोळा करतां कामा नये अगर साठवितां कामा नये, अशी सदरहु करारांत एक अट होती. ग्रामस्थांस मीठ विकलें तरी चालेल, परंतु खेडेगांवाचे बाहेर तें जातां कामा नये, असाहि त्यांत खुलासा केलेला होता. डोक्यावरूनच फक्त मीठ वाहण्यास परवानगी होती. मिठाबाबतच्या ह्या सवलती हिंदुस्थान सरकारनें मध्यंतरीं काढून घेतल्या होत्या, त्या पुनः देण्यांत आल्या आहेत. सदरहु सवलतींचा दुरुपयोग झाल्याचें आढळल्यास त्या पुनरपि काढून घेतल्या जातील, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

### अर्ज न मागवतां नोकऱ्या दिल्या

ऑगस्ट १९३५ पासून आतांपर्यंत, ऑल इंडिया रेडिओवरील ६५ जागा सदरहु जागांसाठी अर्ज न मागवतां अगर फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे किंवा सिलेक्शन कमिट्यांकडे विचारणा न करतां कंट्रोलरनें भरल्याचें सरकारतर्फे असेंब्लींत कबूल करण्यांत आलें. ह्या नेमणुका करणें ही कंट्रोलरच्या अधिकारांतली गोष्ट होती;तथापि ह्यापुढें सिलेक्शन कमिटीच्या सल्ल्यानेंच नेमणुका करण्यांत याव्या, असा हुकूम सरकारनें दिला आहे.


शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.



एच. एच. दि छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील

जाधव कॉलेज ऑफ

**टेलरिंग ॲन्ड कटिंग**

जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा.

नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

Last year 1936-37

Exceeds

2 CRORES & 82 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

वरील बँकेची साधारण सभा रविवार, ता. २७ फेब्रुवारी रोजीं पुणें येथें नूतन मराठी विद्यालय हायस्कुलाच्या सभागृहांत भरली होती. त्यावेळीं भागीदारांनीं बँकेचा ३१ डिसेंबर, १९३७ अखेरच्या वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक व नफ्याची वांटणी हीं मंजूर केलीं. वर्ष अखेर बँकेस एकूण नफा १३,७५२ रु. ६ आ. ८ पै झाला.त्याची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली:—

| | रु. आ. पै |
|---|---|
| रिझर्व्ह फंड ... ... | २,८७०—०—० |
| कॉंटिन्जन्सी फंड ... ... | ४,०००—०—० |
| शेअर विक्रीवरील कमिशनची पूर्ण रक्कम (१७५३ रु. ६ आ.) व प्राथमिक खर्चापैकीं ८११रु. ० आ. १० पै ... | २,५६४—६—१० |
| वर्षअखेरचें डिव्हिडंड ३½% दरानें (करमाफ) ... | ३,७८२—१५—१० |
| नोकरवर्गास बोनस ... | ५३५—०—० |
| एकूण नफा | १३,७५२—६—८ |

डायरेक्टरांनीं आपल्या रिपोर्टांत, बँकेनें अल्पावधींत केलेल्या प्रगतीबद्दल भागीदारांस समाधानें वाटेल अशी आशा व्यक्त केली. दुसऱ्या वर्षअखेरचें बँक थोडेंफार डिव्हिडंड देऊं शकली, इतकेंच नव्हे तर प्राथमिक खर्चापैकीं कांहीं भाग काढून टाकून गंगाजळींतहि रकम घालूं शकली, ह्याचें श्रेय जनतेचें सहाय व विश्वास आणि नोकरवर्गाची दक्ष कामगिरी ह्यांस असल्याचें डायरेक्टरांनीं नमूद केलें. १९३६ सालाप्रमाणें अहंवालाचे वर्षींहि डायरेक्टरांनीं वेतन अगर फी घेतलेली नाहीं.

प्रो. वा. गो काळे (बँकेचे अध्यक्ष) श्री. धों. कृ. साठे (बँकेचे उपाध्यक्ष) व श्री. न. ग. पवार हे तिघे डायरेक्टर पाळीप्रमाणें निवृत्त झाले, त्यांची साधारण सभेनें फेरनिवडणूक केली. श्री. एफ. डी. पदमजी हे डायरेक्टरच्या जागेवरून निवृत्त झाले, तेहि पुनः निवडून आले. श्री. डी. जी. जोशी व जी. डी. आपटे ह्यांची ऑडिटर म्हणून फेरनेमणूक झाली.

(भागीदारांस डिव्हिडंड ता. ८ मार्चनंतर मिळेल.)

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

३१।१२।३७ रोजींच्या ताळेबंदांतील प्रमुख बाबी.

| देणें | रु. |
|---|---|
| भरणा झालेलें भांडवल | १,१२,४४० |
| रिझर्व्ह फंड | १३० |
| ठेवी | १२,१३,३८७ |
| निवळ नफा (१९३७ सालाबद्दलचा) | १३,७५२ |
| **येणें** | **रु.** |
| कर्जें, कॅश, डिस्कौंट केलेलीं बिलें क्रेडिट्स, ओव्हरड्राफ्ट्स, | ५,०४,९२३ |
| प्राथमिक खर्च | ४,३३७ |
| शेअर विक्रीवरील कमिशन | १,७५३ |
| रोखे, भाग इत्यादींत गुंतविलेली रकम | ६,९८,३६६ |
| शिल्लक, रोख व बँकांत | १,१९,५३५ |

### प्रो. काळे ह्यांचें अध्यक्षीय भाषण

बँक ऑफ महाराष्ट्राच्या तिसऱ्या सर्वसाधारण सभेचे प्रसंगीं, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं आपल्या भाषणांत बँकेनें गेल्या सालीं केलेल्या प्रगतीचा निर्देश करून कंपन्यांच्या कायद्यांत झालेल्या दुरुस्त्यांमुळें बँकिंगच्या व्यवहारांचें योग्य नियमन होऊन भागीदार व ठेवीदार ह्यांच्या हितसंबंधांचें संरक्षण होण्यास कसें सहाय मिळणार आहे हें सांगितलें. बँक ऑफ महाराष्ट्राचें भागांचें भांडवल आठ हजार रुपयांनीं व एकूण खेळतें भांडवल पांच लक्ष रुपयांनीं गेल्या सालांत वाढलें. त्याचप्रमाणें,सेव्हिंग्ज बँकमधल्या खात्यांची संख्या दुप्पट झाली आणि सुमारें पस्तीस हजार चेक्स हाताळले गेले इत्यादि तपशीलवार माहितीहि त्यांनीं दिली. बँकेनें कॅश क्रेडिटस व लोन्स ह्यांच्या स्वरूपांत दिलेल्या कर्जांविषयींचे आंकडे सांगून प्रो. काळे ह्यांनीं गेल्या सालीं रोखे बाजारांत कर्जरोखे व कंपन्यांचे भाग ह्यांच्या किंमतींत घडून आलेल्या चढ-उताराचा उल्लेख केला. बँकेनें सहा लक्ष रुपये सरकारी व निमसरकारी रोखे आणि डिबेंचर्स वगैरेमध्यें गुंतविले आहेत. त्यांत बिनमुदतीचे रोखे मुळींच नसून, त्यांची खरेदीची व बाजाराची किंमत ह्यांमध्यें होणारा फरक जरूर पडल्यास भरून काढण्यासाठीं गेल्या वर्षाच्या नफ्यामधून चार हजार रुपये बाजूस काढून ठेवण्याची व्यवस्था केली आहे ह्या गोष्टीचाहि त्यांनीं निर्देश केला. गंगाजळींत नफ्याचा मोठा अंश टाकून अगदी बेताचें डिव्हिडंड वांटण्याच्या धोरणाचें विवेचन करून डायरेक्टर्सचें ध्येय बँकेच्या सुरक्षिततेकडे व व्यवहारांच्या चोखपणाकडे डोळ्यांत तेल घालून पाहण्याचें आहे असें त्यांनीं सांगितलें. मध्यवर्ती कायदेमंडळांत हुंड्या व चेक्स ह्यांवरील स्टँपड्यूटीबाबत पुढें आलेल्या बिलाची माहिती प्रो. काळे ह्यांनीं दिली. मुदती हुंड्यांवरील ड्यूटी कमी होणें आवश्यक आहे, पण चेक्सवर ड्यूटी आज नाहीं ती पुन्हां बसविणें अनिष्ट कसें आहे ह्याचा त्यांनीं खुलासा केला. अखेर, जनतेची सहानुभूति व पाठिंबा ह्यांच्याच सहायामुळें बँकेची प्रगति होऊं शकली असल्यानें त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून बँकेचे मॅनेजर व नोकरवर्ग ह्यांच्या निरलस व चोख कामाबद्दलें त्यांनीं प्रशंसापर उद्गार काढले.

---

## वेस्टर्न इंडिया हाऊस

### वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची नवी इमारत

सातारा येथील वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनीनें सुमारें पांच लाख रुपये खर्च करून मुंबई येथें फेरोजशहा मेथारोडवर जी एक भव्य सहा मजली इमारत बांधली आहे तिचा उद्घाटनसमारंभ जगप्रसिद्ध हिंदी व्यापारी आणि महात्मा गांधीजींचे स्नेही श्रीमान् शेठ घनश्यामदास बिर्ला यांचे हस्तें मुंबई येथें ता. १० एप्रिल रोजीं करण्याचें ठरलें असून बिर्ला शेटजींनीं एवढ्यासाठीं मुद्दाम मुंबईस येण्याचें कबूल करून महाराष्ट्राच्या या श्रेष्ठ आदर्श विमा संस्थेचा मोठा गौरव केला आहे. याप्रसंगीं मुंबईंतील सर्व प्रसिद्ध व्यापारी आणि पुढारी, मुंबई सरकारचे मंत्री, कायदेमंडळाचे सभासद वगैरे कंपनीच्या शुभचिंतनार्थ जमा होणार असून इमारतीला **वेस्टर्न इंडिया हाऊस** असें नांव देण्यांत येणार आहे.

## सहकारी चळवळीचें पुनरुज्जीवन

### श्री. मनसाळी व श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा रिपोर्ट

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीचें समालोचन करून, तिच्या पुनर्घटनेविषयीं तपशीलवार सूचना करण्याचें काम महसूल मंत्र्यांनीं सहकारी रजिस्ट्रार, श्री. मनसाळी व प्रांतिक सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचेवर गेल्या सप्टेंबरांत सोपविलें होतें. ह्या उभयतांनीं आपला संयुक्त रिपोर्ट ता. ३० आक्टोबर रोजीं सादर केला. ह्या रिपोर्टांतील सूचनांचा विचार करण्यासाठीं महसूल मंत्र्यांनीं ता. २२ नोव्हेंबर रोजीं प्रातिनिधिक सहकारी कार्यकर्त्यांची एक परिषद् भरविली. ह्या विषयावरचा सरकारचा अखेरचा हुकूम आतां अपेक्षित आहे.

शेतकी पतपेढ्यांच्या थकबाकीच्या विचारास वरील रिपोर्टांत अग्रस्थान देण्यांत आलें आहे. "येत्या हिशेबतपासणीचे वेळीं सरकारी ऑडिटरांनीं सोसायट्यांच्या जिंदगीची कसून तपासणी करावी, बुडीत कर्जे अजमावींत व थकलेल्या व्याजाच्या बाकींत सूट सुचवावी. काम लवकर व्हावें, ह्यासाठीं जरूर तेथें जादा ऑडिटर नेमावेत. थकबाकी रद्द करण्याचें कार्य त्वरित होणें जरूर आहे.नाठाळ सभासदांस कर्जफेडीचे बाबतींत चुकारपणा करण्यास वाव मिळूं नये, अशा हेतूनें सोसायट्यांच्या घटनेंत दुरुस्ती करावी. शेतकी पतपेढ्यांचें काम शेतीच्या मालाचे विक्रीशीं संलग्न करण्यांत यावें आणि मालविक्रीच्या पैशांतून कर्जवसुलीची व्यवस्था व्हावी.सोसायटच्या अगर सभासद नव्या शिस्तीप्रमाणें वागत नाहींत, असें दिसल्यास जरूर ती उपाययोजना तात्काळ करण्यांत यावी. लवाद, निवाडे व लिक्विडेशन ह्यांस विलंब होऊं नये"

अनुकूल परिस्थिति असेल तेथें बँकिंग यूनियन्स स्थापन होण्याचे बाबतची शिफारस अत्यंत महत्वाची आहे. मालाचे तारणावर कर्जे देण्यास बँकांस उत्तेजन मिळावें, असें रिपोर्टलेखकांचें म्हणणें आहे. सेंट्रल व अर्बन बँकांच्या असोसिएशन्स स्थापण्यांत आल्या, म्हणजे त्यांस त्रुटीनें व एकमेकांस पूरक असें कार्य करतां येईल. सोसायटी अगर बँक ह्यांचेविरुद्ध सरकारनें कारवाई करण्यापूर्वी नियोजित संस्थांचा सल्ला घेण्यांत यावा, अशी शिफारस करण्यांत आली आहे. सहकारी वर्षांतून एकदा तरी प्रत्येक सोसायटीचें ऑडिट झालें पाहिजे; तसें न झाल्यास वसूल केलेली ऑडिट फी परत दिली पाहिजे, अशी सूचना आहे. बँकांच्या बाबतींत हिशेबतपासणीचें काम लायक रजिस्टर्ड अकौंटंटांमार्फत होण्यासंबंधीं त्यांचा आग्रह आहे.

जिल्हानिहाय सुपरव्हिजन बोर्डांची स्थापना, त्यांचें कार्यक्षेत्र, प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची पुनर्रचना, इत्यादि प्रश्नांचें विवेचन रिपोर्टांत आहे. त्यासंबंधांतील शिफारसींचा परामर्श "अर्थां"त मागेंच घेण्यांत आला आहे आणि सदरहु विषयावर विधायक सूचना आम्हीं केल्या आहेत व ह्यापुढें करणार आहों.

शेतींत सुधारणा व्हावी व दुय्यम उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळावें, ह्या दृष्टीनें सहकारी तत्त्वाचा उपयोग कसा होईल, हें रिपोर्टाच्या शेवटच्या भागांत सांगितलें आहे. महत्त्वाच्या बाजारपेठांतून मालाच्या उठावाची व्यवस्था करण्यांत यावी, ह्या केंद्रांचे क्षेत्रवार अगर मालाचे प्रकाराप्रमाणें गट पाडण्यांत यावेत व एका मार्केटिंग अधिकाऱ्याचे देखरेखीखालीं मुंबई शहरांत एक मार्केटिंग एजन्सी स्थापावी, अशी कमिटीची सूचना आहे. जमीनीच्या सुधारणेकरितां मुंबई प्रॉ. लँड मॉर्गेज बँकेमार्फत कर्जाची तजवीज सुलभतेनें व्हावी व त्यासाठीं बँकेच्या कानूंत जरूर त्या दुरुस्त्या केल्या जाव्या; त्याचप्रमाणें, प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांची संख्या वाढवून जमीन सुधराईच्या योजना आखून त्या पार पाडण्याची जबाबदारी त्यांजवर टाकण्यांत यावी, अशी कमिटीची शिफारस आहे. शेतकऱ्यांनीं एकजुटीनें कांहीं सुधारणा अंमलांत आणण्यास त्याबाबतच्या सोसायट्यांमार्फत प्रारंभ केला, म्हणजे सहकारी पद्धतीनें शेती करण्यासहि उत्तेजन मिळेल, अशी तिची अपेक्षा आहे.

खेडेगांवीं उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं, उत्पादकांच्या सहकारी सोसायट्या स्थापून जिल्ह्याच्या इंडस्ट्रिअल असोसिएशन्सशीं त्यांचा संबंध जोडावा, असें सुचवून ह्या असोसिएशन्सच्या कार्याची रूपरेषा कमिटीनें दिग्दर्शित केली आहे. खेडेगांवांतील स्त्री-कामगारांचें संघटन घडवून आणून त्यांच्या तयार मालास गिऱ्हाइक मिळवून देण्याकरितां शहरांतील स्त्रियांच्या संस्थांचें सहकार्य मिळवावें, अशी कमिटीची शेवटची शिफारस आहे.

---

## हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक

### करवाढ नाहीं . पण कर कमीहि होत नाहींत

### उत्पन्न खर्चाची तोंडमिळवणी

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांनीं मध्यवर्ती सरकारचें १९३८–३९ सालाबद्दलचें अंदाजपत्रक गेल्या शनिवारीं असेंब्लीस सादर केलें. येत्या वर्षी एकूण उत्पन्न ८५ कोटि, ९२ लक्ष रु. होऊन खर्च ८५ कोटि, ८३ लक्ष रुपयांत भागेल व ९ लाखांचा वाढावा उरेल, अशी अपेक्षा आहे.

१९३८–३९ मध्यें, चालू सालाचे मानानें, उत्पन्नांत थोडी घटच होण्याचा संभव आहे. १९३७–३८ मध्यें कस्टम्सचें उत्पन्न अत्यंत समाधानकारक आलें, तितकें तें येत्या वर्षी येईलच असें सांगतां येत नाहीं, म्हणून ह्या बाबतींत ६० लक्ष रुपये उत्पन्न कमी धरलेलें आहे. प्राप्तीवरील करापासून २५ लक्ष रु. ज्यास्त मिळतील ते व रेल्वेजच्या हिशेबांतील वाढावा हे धरून, चालू वर्षापेक्षा येत्या वर्षी उत्पन्नांत फक्त ३७ लाखांचीच घट दिसेल, असा अजमास आहे.

प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभ होण्यास सहाय म्हणून मध्यवर्ती सरकारनें चालू वर्षी प्रांतांस प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांपैकीं १ कोटि, ३८ लक्ष रु. वांटून दिलें. १९३८-३९ सालीं ह्या करापैकीं १ कोटि, २८ लक्ष रुपये प्रांतांस मिळतील. रेल्वेज व प्राप्तीवरील कर ह्यांपासून मध्यवर्ती सरकारास १३ कोटीपेक्षा जास्त रकम मिळाल्यास, वाढाव्याची वांटणी प्रांतांत करावी, अशी नीमायर योजना आहे आणि तीस अनुसरून ही व्यवस्था होत आहे.

लष्करी खात्यावर येत्या वर्षी चालू वर्षापेक्षा ३८ लक्ष रु. ज्यास्त खर्चावे पडावयाचे आहेत. हिंदुस्थानाच्या नाविक संरक्षणाचे कामगिरीप्रीत्यर्थ सरकार ग्रेटब्रिटनला दरसाल १३½ लक्ष रु. देत असे; आतां हिंदी बंदरांच्या संरक्षणासाठीं हिंदुस्थान सरकारच स्वतः सहा युद्ध नौका बाळगणार आहे. वैमानिक वहातुक, ब्रॉडकास्टिंग, शेती, इत्यादि बाबींवरहि थोडासा ज्यास्त खर्च करण्यांत यावयाचा आहे.

---

## वीज कंपन्यांच्या नफ्यावर नियंत्रण

### लायसेन्सदारांनीं पाळावयांच्या अटी

वीज, ट्रामवे, इत्यादि सारखे, जनतेच्या नित्याच्या आयुष्यक्रमास आवश्यक परंतु मालकांस फलदायी असे धंदे सरकार जरूर वाटल्यास स्वतःच्या ताब्यांत घेईल, असें मुंबई सरकारच्या फडनविसांनीं आपल्या पहिल्या बजेटाच्या भाषणांत ध्वनित केलें होतें. कांहीं झालें तरी, वीज कंपन्यांच्या नफ्यांत सरकारास व गिऱ्हाइकांस सामील करण्याचें आपलें धोरण त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें होतें. विजेच्या दराची कमाल मर्यादा निश्चित करण्याकरितां आतां सरकारनें एक कमिटी नेमली आहे. त्याचप्रमाणें, नवीन लायसेन्सदारांनीं कांहीं अटी पाळल्या पाहिजेत असें जाहीर केलें आहे; त्यांतील प्रमुख खाली दिल्या आहेतः—

( १ ) लायसेन्सदारास ( अगर भागीदारांस ) निवळ नफ्यापैकीं प्रथम ४ टक्के मिळतील. उरलेला नफा लायसेन्सदार, (अगर भागीदार ) विजेचें ग्राहक व सरकार ह्यांत सारखा वांटला जाईल.

( २ ) वीज कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावर आपला प्रतिनिधि नेमण्याचा सरकारास अधिकार राहील.

( ३ ) विजेचा धंदा करण्यासाठीं स्थापन केलेल्या कंपनीसच लायसेन्स वर्ग करतां येईल व लायसेन्स मिळविण्याकरितां व इतर आलेला भांडवली खर्च, ह्यांपेक्षा ज्यास्त रकम त्याबद्दल घेतां येणार नाहीं.

( ४ ) अपेक्षित खर्चाच्या २० टक्के रकम सरकारांत प्रथम अनामत ठेवली पाहिजे.

( ५ ) विजेच्या उत्पादन-खर्चाच्या मानानें शेती व लहान उद्योगधंदे ह्यांस पुरवावयाच्या विद्युत्शक्तीचे कमाल दर सरकार निश्चित करील.

( ६ ) विजेच्या कंपनीची मालमत्ता सरकारास विकत घेण्याचा अधिकार आहे. लायसेन्सच्या सुरवातीनंतर ३० वर्षांनीं व पुढें प्रत्येक १० वर्षांनीं हा हक्क उपभोगतां येईल.

( ७ ) लायसेन्स देण्यापूर्वीं, कंपनी व तिचे मॅनेजिंग | एजंट ह्यांमधील कराराची तपासणी करण्याचा सरकारास अधिकार आहे.

( ८ ) जरूर त्यावेळीं लायसेन्समधील विजेच्या दराबाबतच्या कलमांत फेरफार करण्याची सरकारास सवड राहील.


घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

**संगीत-मार्गदर्शक**

मालेचीं पुस्तकें.

गायन कि. ६ आ. हार्मोनियम किं. २॥ रु. दिलरुबा किं. १ रु. २ आ. फिडल् किं. १ रु. ४ आ.

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner POONA, 2.

**The Co-operators' Book Depot.**
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published any where and supply it at publisher's price.

**कोर्ट फी, स्टँप ड्यूटी व विजेवरील पट्टी कायम होणार**

कोर्ट फी, स्टँप ड्यूटी व विजेवरील पट्टी ह्यांचेपासून मिळणारें उत्पन्न मुंबई सरकारच्या कारभारास अनवश्यक ठरण्याची वेळ येण्याचा सरकारास संभव वाटत नाहीं, ह्यासाठीं ह्या कराच्या बाबी कायम करण्याचा सरकारचा मानस आहे. १९३२ च्या फिनॅन्स विधानान्वयें त्यांची मुदत ३१ मार्च, १९३८ अखेर संपते, ती अमर्याद वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. विजेचे दिवे व पंखे ह्यांस लागणाऱ्या विजेवर सध्या प्रत्येक यूनिटवर अर्धा आणा कर आहे. कांहीं विशिष्ट ठिकाणीं ही पट्टी पाऊण आणा केली जाईल. रोखे बाजारांतील देवघेवींमधील स्टँप ड्यूटीचें उत्पन्नहि वाढविण्यांत यावयाचें आहे. वरील दुरुस्त्या करणाऱ्या बिलाचा मसुदा मुंबई सरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

---

**फुग्याच्या ( न्युमॅटिक ) रबरी धावांची ज्युबिली**

हवेनें फुगवलेल्या रबरी धावा दुचाकी गाड्यांस बसवण्याची कल्पना, मि. जे. बी. डन्लॉप ह्यांनीं जुलै १८८८ मध्यें त्यासंबंधाचें पेटंट घेतलें तेव्हां कृतीमध्यें आली. त्या गोष्टीस पन्नास वर्षे चालू सालीं पुरीं होत असल्यानें डन्लॉप रबर कंपनीनें ज्युबिली साजरी करण्यासाठी आपल्या धंद्याचा एक चित्रपट तयार केला आहे. त्यामध्यें सदरहु धंद्याचा आमूलाग्र इतिहास चित्रित केलेला आहे. न्यूमॅटिक रबरी धावांचा उत्पादक बेलफास्ट येथें गुरांचा वैद्य म्हणून धंदा करीत असे आणि त्यानें आपल्या मुलाच्या तिचाकी गाडीच्या धावांवर प्रथम प्रयोग केले.

---

**बिहारमधील धरणीकंपजन्य दुःस्थितीचें निवारण**

१५ जानेवारी, १९३४ रोजीं झालेल्या बिहारमधील धरणीकंपामुळें त्या प्रांतांतील लक्षावधि लोकांची दुर्दशा उडाली. त्यांस मदत करण्याचे हेतूनें बिहार सेंट्रल रिलीफ कमिटीची तात्काळ स्थापना करण्यांत आली व तिलाच पुढें अखिल भारतीय स्वरूप देण्यांत आलें. कमिटीकडे एकूण २८ लक्ष, ८६ हजारांच्या देणग्या जमा झाल्या व तिची एकूण जमा २९ लक्ष, ८८ हजार रु. इतकी झाली. ५ लाखांच्या देणग्या वस्तूंचे स्वरूपांत आल्या त्या ह्याहून वेगळ्या. ३१ मार्च, १९३८ अखेर कमिटीनें २७ लक्ष, ६९ हजार रु. खर्च केले. कमिटी ज्या हेतूनें स्थापन झाली, तो पूर्ण झाला असल्यानें, शिलकी रकमेचा विनियोग त्याच प्रकारच्या कार्याकडे करण्यासाठी ट्रस्टींची नेमणूक करण्याचें ठरलें आहे.

---

**लष्करांतील अधिकारीवर्गाचें हिंदी करण : प्रगति थांबली**

डेहराडून येथील मिलिटरी ॲकेडमीमध्यें सध्या ६० उमेदवारांस प्रवेश मिळतो. ही संख्या दुप्पट करावी, असा ठराव कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें आला असतां सरकारतर्फे त्यास विरोध होऊन तो नापास झाला. कमांडर-इन-चीफ, सर रॉबर्ट कॅसेल, हे म्हणाले, "लष्करी खात्यांत कायम नोकरी करणें अनेक हिंदी अधिकाऱ्यांस आवडत नाहीं. साठांपेक्षा अधिक लायक उमेदवार ॲकेडमीस मिळतील, असें वाटत नाहीं. सरकारनें ह्याबाबत पूर्ण चौकशी करून, लष्करांतील अधिकारीवर्गाच्या हिंदीकरणाचें पाऊल पुढें टाकण्याची अद्याप वेळ आलेली नाहीं, असें ठरविलें आहे."

---


**गव्हाचे पोहे**

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.


---

**ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत**

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

---



**टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स**

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]

मो. मु. टिळक

प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,

---




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

---

The Home for

Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS

**MARATHI KENDRA** : 292 *Sadashiv Peth* POONA

---

**K. K. & Co.**

Photographic Dealers

POONA.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११९—२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन | १०४—८ |
| ४% १९४३ | १०८—८ |
| ३½% विनमुदत | ९८-१०½ |
| ३½% १९४७-५० | १०६—४ |
| २¾% १९४८-५२ | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११४-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | ३२—८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५७२—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११८-१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० ) ४¾% | १०२—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० ) ४½% | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९४५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७५२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | ११९—१ |
| कराची ( १०० ) ९% | २०३-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४२७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १५५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४६-१२ |
| सिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २१—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ४ आ. | ४८-१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस | ४,३१६—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०५-१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १७०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २४२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | १,०००—० |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३४—५½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५०-११½ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—४ |
| „ केसर प्रत्येक मणास | ११-१५ |
| „ सरया प्रत्येक मणास | ११—९ |


## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस—औंध ( सातारा )

शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी, बिचूद स्टेशन व दिघंची.

चालू ठेवींवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवींवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चोकशी करावी.

कर्जें—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.



## न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—

(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )



## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ९ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एगेमाक रिंटिंग, सडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६९५ सदाशिव पेठ.

## संजीवन हेअर टॉनिक

**दारुणा, केंस गळणें व टक्कल**

**ह्यावर अनुभविक उपाय**

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

SAHYADRI INS. CO
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

**कामाची वेळः—**

**दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १**

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २॥, किंवा प्रथम ६।८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर-मुंबई.

यांचे ओरिजिनल **ब्राह्मी तेल**

मेंदूचे विकार व डोके दुखणें यांवर

**बाळंतकाढा**

नं. १ दहा दिवसांत घेणेचा.

नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.

मुलांकरितां **बाळकडू. कुमारी आसव**

मुख्य दुकानः ठाकुरद्वार. शाखाः परळ व दादर.

पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९, सायंकाळीं ४॥ ते ५॥.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.